# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


**जा.क्र. जनसंपर्क कक्ष/ वार्तापत्र/ /२०१८, पो.अ. कार्यालय भंडारा, दिनांक /०७/२०१८**

## विशेष वार्तापत्र

## भंडारा जिल्हा पोलीसांचे अवैध दारू व्यवसायांवर धाडसत्र, एकुण ३,७५,१०० रूपयाचा मुद्देमाल जप्त

**पोलीस ठाणे लाखांदुर** :- दिनांक २९.०७.२०१८ रोजी मा. पोलीस अधिक्षक भंडारा श्रीमती विनीता साहू, मा. अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, उप विभागीय पोलीस अधिकारी प्रभाकर तिक्कस यांच्या मार्गदर्शनाखाली लाखांदुर येथुन दारू बंदी असलेल्या चंद्रपुर जिल्हयात अवैध दारू वाहतुक होत असल्याचे खबरेवरून ठाणेदार पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, सोबत पोलीस कर्मचारी कापगते, बोरकर, बावणकुळे यांचेसह चप्राड गावालगत योग्य सापळा रचुन अवैध देशी दारू वाहतुक करणारे वाहन एम.एच. २८ सी ३८२१ व चालक पंकज कुसन कावळे, वय ३१ वर्ष, रा. बेलघाटा वार्ड, पवनी याचे सह ताब्यात घेवनु ५५ खरडयाचे खोके प्रत्येक खोक्यामध्ये १०० नग प्रत्येकी ९० एम.एल. देशी दारुने भरलेले किमंती १,४३,००० रूपयाची अवैध देशी दारू व एका चंदेरी रंगाची चारचाकी टाटासुमो स्पॅसीओ गाडी क्र.एम.एच. २८ सी ३८२१ किंमती २,००,००० रूपयाची असा एकुण गुन्हयात ३,४३,००० रूपयाचा माल मिळुन आला आहे. त्याच प्रमाणे पोलीस हवालदार उईके यांनी आरापी नामे वसंता मुरारी उईके, वय ५९ वर्षे, रा. मोहरना याचे ताब्यातुन अवैध ९० मिली देशी दारुने भरलेले २०० बॉटल असा एकुण ५,२०० रूपयाचा माल मिळुन आल्याने आरोपीतांन विरुध्द गुन्हा नोंद करून आरोपीतांना गुन्हयात अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार लखन उईके करीत आहेत. सदर आरोपीतास मुद्देमाला बाबत विचारपुस दरम्यान गुन्हयात आनखी काही इसमांनी संगनमत व कट रचुन देशी दारू बाबत शासकीय परवाण्याचे उल्लघंन करुन अवैधरित्या वाहतुक करत अल्याचे निष्पन्न झाले आहे.

**पोलीस ठाणे अडयाळः-** अप.क्र. १०७/२०१८ कलम ६५ (फ) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये आरोपी नामे शैलेश डोमाजी भिमटे, वय ४५ वर्षे रा. अडयाळ यांचेविरुध्द पोलीस स्टेशन अडयाळ येथे गुन्हा नोंद करण्यात आला असुन गुन्हयात ६०००/- चा माल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भोंगाडे/१०८ हे करीत आहेत.

**पोलीस ठाणे मोहाडीः-** अप.क्र. १०९/२०१८ कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये आरोपी नामे रोशन ताराचंद नागदेवे, वय ५५ वर्षे रा. मांढळ याचे ताब्यात अवैध हात भटटी दारू किंमती २७००रूपयाची मिळुन आल्याने त्याचे विरुध्द गुन्हा नोंद केला व आरोपीस गुन्हयात अटक करून पुढील तपास करीत आहेत.

**पोलीस ठाणे भंडाराः-** अप.क्र. ५८४/२०१८ कलम ६५ (अ)(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये आरोपी नामे १) महेश महादेव भोपे, वय ३० वर्षे, २) जयदेव किसन दुर्गे ,वय ४२ वर्षे, दोन्ही रा. आसगांव यांना अटक करण्यात आली असुन त्याचे ताब्यात एका काळया रंगाच्या थैलीमध्ये बिना पास परवानां विदेशी दारुचे (ईम्प्रेरल ब्ल्यु) बॉटल एकुण २५ बॉटल किंमती ३५५/-रु. व मोटार सायकल क्र. एमएच-३६ सीटी १०० वाहन कि. १०,०००/- रु. असा एकुण १३,५००/- रु. सह ताब्यात बाळगुन विक्री करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस नाईक, भोयर/९५५ करीत आहेत.

यासोबत पोलीस ठाणे भंडारा, पालांदुर येथे आरोपी नामे जगनेश्वर प्रभाकर शेंदरे, वय ३६ वर्ष, रा. चांदनी चौक भंडारा, सुमीत नरेश बोरकर, वय २५ वर्ष रा. आंबेडकर वार्ड भंडारा, सुरेश नथ्थु गेडाम, वय ५३ वर्ष रा. किटाळी यांचे कडुन अवैध १७०० रूपयाची मोहाफालाची हात भटटी दारू मिळुन आल्याने त्यांचे विरूध दारूबंदी कायदया अंतर्गत गुन्हे नोंद करून स्थानिक पोलीस पुढील तपास करीत आहेत.

**(जितेंद्र आडोळे)**
**पोलीस उप निरीक्षक,**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा**
**संपर्क क्र. ९४०३१०९७२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक
वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत,** संगणक कक्ष, पो.अ. कार्या.भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतसथळावर ठेवण्याकरीता.